
शब्द आणि चित्रे विलीयम डे विक

# येशू मसिहा

सर्वात महान गोष्ट




## काय आहे...



**देवदूत**: देवाचा एक अदृश्य संदेशवाहक. (पान ५)

**आशीर्वाद**: सर्व चांगल्या गोष्टी ज्या मनुष्याला द्याव्या असे देवाला वाटते.



**बायबलः** बायबल मध्ये तुम्ही वाचू शकता की कश्याप्रकारे देव लोकांकडे लक्ष देतो आणि कसा तो त्यांच्याशी वागतो.

**भोजनोत्सवः** येशुचे अनुयायी येशुची आणि पूनरुत्थानाची आठवण भाकरी व द्राक्षरस याने करतात. (पान ४१)




**वधस्तंभः** यातना देण्याचे एक साधन ज्यावर येशू स्वतः ईच्छेने मरण पावला, येशूच्या अनुयायांचे ते एक चिन्ह बनले. (पान २५,५०)

**शिष्यः** येशूचे अनुयायी. (पान १८)




**ईस्टरः** येशूचा पूनरुत्थनाचा सण जो साजरा करतात. यहूदी हयाच दिवशी वल्हाणंडणचा सण साजरा करतात. (पान ३८-५४)

**अनंत जीवनः** येशू सोबत जीवन असणे, असा देवाचा हेतू आहे, ते मृत्यूवर विजय मिळून अनंत जीवन आहे. (पान २३,२९-३० आणि ५९)



**विश्वासः** देवावर विश्वास ठेवणे आणि त्याच्या आश्वासनावर विश्वास ठेवणे. (पान५८)



**क्षमाशीलता**: देव क्षमा करतो,जरी कोणी एकसुध्दा त्यासाठी पात्र नाही, देव क्षमा करतो जर तुम्ही पापांची क्षमा मागाल आणि परिवर्तन कराल तर क्षमाशीलता शक्य आहे कारण की येशूच्या बलीदानामुळे आपण त्यासाठी पात्र आहो. (पान५८)

**देवाचे राज्यः** जेथे लोक देवाची आज्ञा पाळतात तेथे देवाचे राज्य आहे.

**पवित्र आत्माः** देवाचा आत्मा जो लोकांमध्ये राहतो जे येशूचे अनुयायी आहेत. (पान ५८)

येशू देवाच्या पुत्राचे नाव, म्हणजेच तारणरा देव.

**मसीहाः** अभिषिक्त राजा मसीहा (एक हिब्रू शब्द) जो ग्रीक भाषांतरीत म्हणजे ख्रीस्त. (पान ५२, ५५)

**प्रार्थनाः** तुम्ही देवा सोबत हळू किंवा मोठ्याने बोलणे आणि त्याचे ऐकणे होय. (पान १८,१९,४२)

**पुनरुत्थानः** येशू मरणातून पुन्हा उठला, एक दिवस प्रत्येकजण मरणातून उठणार, तेंव्हा देव प्रत्येक मनुष्यांचा न्याय करणार. (पान ५३,५७)

**परत येणे**: जेंव्हा येशू पृथ्वीवर परत येणार, स्वर्ग आणि पृथ्वी नविन असणार, देवाद्वारे सर्वकाही नविन बनेल. (पान ५७)

**सैतानः** अदृश्य स्वरुपात असणारा देवाचा व मनुष्याचा शत्रु

**पापः** ज्या गोष्टी आपण देवाच्या ईच्छेविरुध्द करतो, आणि देवाजवळील लक्ष जे आपल्यासाठी आहे त्यापासून आपल्याला दुर ठेवते. (पान ४)

**देवाचा पुत्रः** येशूचे नाव, जसा देवाचा पुत्र म्हणून जो मनुष्य स्वरुपात पृथ्वीवर आला.



## यीशू मसीहा कोण आहे?


यीशू २००० वर्षापूर्वी इस्त्रायल मध्ये राहिला. आपण त्याला येशू मसीह किंवा येशू ख्रिस्त म्हणतो. म्हणजेच तो एक राजा, एक देवाचा पुत्र मनुष्याकडून आलेला आहे. बायबल मध्ये येशूच्या जिवनाचा इतिहास नोंदिला आहे, ती एक महान गोष्ट आहे.

## येशूच्या वेळी

आपला इतिहास येशूच्या जन्मासोबत सुरु होतो. तेव्हा लोकांचा प्रवास पायदळ, गाढवांवर, उंटांवर किंवा घोडयावर असायचा, तेव्हा रोमन साम्राज्य हे यूरोप, मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिकामध्ये होते. पुष्कळ लोक लिहिणे किंवा वाचणे जाणत नव्हते. इस्त्रायल मधील यहूदी त्यांना पुस्तकातील लोक म्हटले गेले.

देव पुस्तकात बोलतो, बायबल, सर्व विद्यमान गोष्टींचा तो निर्माणकर्ता आहे, आणि त्याला सर्व लोकांशी मैत्री करायची आहे. येशूने हे अगदी स्पष्टपणे दाखवले!






# येशूच्या काळातील इस्त्रायल

**राजधानी**: यरुशलेम

**मोठा प्रांत**: गालीली, सामरिया, यहूदा.

**आकार**: अंदाजे २८००० किमी. (१०,८१० मैल)


**हवामान**: दमट


**राजकीय**: ६३ बी. सी. पासुन (ख्रिस्ता अगोदर) रोमन राज्याचे नियेत्रण इस्त्रायलमध्ये आहे.


**शासन**: मुख्य पिलात, रोमन राज्यपाल इस्त्रायलमध्ये राज्य, तिबेरियस, रोमी साम्राज्य.


**धर्म**: यहूदी धर्म, यरुशलेममध्ये यहूद्यांचे मंदीर आहे. तेथे यहूदी पुजारी सर्व धर्म कार्य करतात आणि (जसे परुशी) ते बायबल मधून लोकांना शिकवतात.

**भाषा**: हिब्रू (यहूद्यांची भाषा) ग्रीक (आंतरराष्ट्रीय बोलल्या जानारी भाषा) लॅटीन (रोमन भाषा)



हे सगळे लोक नदीकडे का एकत्र जमले आहेत?
तुम्ही स्वतःला तयार करा, देवाचे राज्य जवळ येत आहे.


एक नविन जिवन सुरू करा!
देवाच्या न्यायाची कुऱ्हाड अगदी झाडांच्या मुळावर आहे.
प्रत्येक झाड जे फळे उत्पन्न करत नाहीत, ते कापल्या जातील.
आपण सगळे कदाचित कापले जाऊ कोण चांगले जीवन जगण्यासाठी सक्षम आहे.
अगदी बरोबर कोणीही देवाच्या न्यायापासून निसटून जावू शकत नाही. परंतु माझ्या मागुन कोणी एक येत आहे जो तुमच्यामध्ये परिवर्तन करु शकतो.
जर खरच तुम्हाला तुमच्या जिवनामध्ये परिवर्तन पाहिजे असेल तर तुम्ही तुमचे पापे कबूल करा आणि बाप्तिस्मा घ्या.
आता तू तुझ्या पापांपासून शुध्द झालास.एक नविन जीवन सुरु कर.



प्रत्येकजण त्याला नदीकडील बाप्तिस्मा देणारा योहान म्हणत असे.
मी महत्वाचा नाही. मी त्याच्यासाठी मार्ग तयार करत आहे. जो आपल्याला दाखविणार की परमेश्वर कोण आहे. तो तुम्हाला देवाच्या आत्म्याने व देवाच्या अग्निने बाप्तिस्मा देणार, तो तुम्हामध्ये परिवर्तन करणार.
आणि तेव्हा...
मी... मी तुझ्याद्वारे बाप्तिस्मा घ्यायला पाहिजे.
आपण ते करणार जे देवाची इच्छा आहे ते आता कर.
देव पित्या तुझे राज्य येवो व तुझी इच्छा पुर्ण होवो.
तेव्हा स्वर्गातून एक आवाज आला.
होय तू माझा पुत्र आहेस. मी तुझ्यावर प्रेम करतो व तुझ्यावर मी प्रसन्न आहे.


आपल्या त्या कालखंडात सुरुवातीला योहान बाप्तिस्मा देणारा इस्त्रायली लोकांचा मसीहा येणार म्हणून तो त्यांना तयार करत होता. त्यावेळी इस्त्रायल हा रोमन साम्राज्याचा एक छोटा भाग होता.
कफर्नहुम
नाझरेथ
काना
गालील
यरुशलेम
यहुदा
इस्त्रायल
इस्त्रायल मधील यहुद्यांना असहाय्य लाचार आणि दडपण व खिन्न असे वाटत असे. ते लोक त्यावेळी मसीहा केव्हा येणार अशी वाट बघत असत. तो आपल्याला सोडवणार असे पहिलेच जुन्या यहूदी लोकांच्या पुस्तकात त्याचे भविष्य वर्तविले होते. हा मसीहा देवाचा न्याय विजयी करणार.
यारदेण नदीकडे, योहान बाप्तिस्मा देणारा येशूकडे बघतो.
बघा तो देवाचा कोकरा जो जगाचे पाप दूर करतो.
त्याचा बाप्तिस्मा झाल्यानंतर. देवाचा आत्मा येशूला अरण्यात घेऊन जातो.
तो तेथे चाळीस दिवस व रात्र राहातो, जेव्हा तो तेथे असतो तेव्हा तो काही खात व पित नाही. आपल्या स्पष्ट उद्देशाला पाहण्यासाठी तो तेथे उपवास आणि प्रार्थना करतो.
सैतान हा अदृश्य स्वरुपात अंधारात राज्य करतो व जगाला नाशाकडे व मृत्यूकडे नेतो.
देवाच्या उद्देशला जगामध्ये यशस्वी करणे हे येशूचे ध्येय आहे. लोकांना मृत्यूच्या तावडीतून सोडविणे, ही देवाची योजना आहे.
होयपिता जे तू सांगितले ते मी करणार.



परंतु सैतान, त्याचा विरोधक, येशूला आमिष दाखवून त्याला देवाच्या उद्देशापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करत होता.
जर तू देवाचा पूत्र आहेस तर हया दगडांचे भाकरीमध्ये परिवर्तन करुन दाखव.
असे लिहीले आहे की व्यक्ती फक्त भाकरीने नाही तर देवाच्या वचनांनी जगतो.
जर तू देवाचा पुत्र आहे तर ते सिध्द करुन दाखव. हया मंदिरावरुन उडी टाक. असे लिहिलेले नाही काय की देवदूत तुला हातोहात झेलतील.
असे सूध्दा लिहीले आहे की देवाची परीक्षा पाहू नको.
जर तू मला दंडवत करशील आणि माझी उपासना करशील तर मी तुला हया पृथ्वीवरील सर्व अधिकार देणार.
येथून चालता हो सैताना असे लिहिले आहे की देव एकच आहे व आपण त्याचीच उपासना व सेवा कारायला हवी.
तेव्हा सैतान - येशूला सोडून गेला व देवदूत येवून त्याची सेवा करु लागले.
येशू गालीलामध्ये पवित्र आत्म्याने भरुन गेला. येशू उत्तर इस्त्रायल देशाच्या दाट व मोठ्या प्रांतामध्ये वाढला पुष्कळशे लोक चौकस होते की तो हाच येशू आहे की नाही जसे भविष्य वक्त्यांनद्वारे मसीहा बद्दल लिहीले होते.



कान्हा प्रांता मध्ये कुठेतरी लग्न आहे.
येशू सुध्दा तेथे त्याच्या आईबरोबर व मित्रांबरोबर आहे.


परंतु समारंभाच्या मध्ये एक समस्या...
येशू जे सांगतो तेच तुम्ही करा.
समस्या आहे! हा द्राक्षरस संपला आहे.
ही मोठी रांजने पाण्याने भरुन काढा व हया समारंभाच्या मालकाला हयाची चव घेवू द्या.
?
पाणी? परंतु हा द्राक्षरस आहे, वाह... उत्तम द्राक्षरस.
चव घ्या, तुम्ही चांगला द्राक्षरस शेवटपर्यंत ठेवला आहे.
अशा प्रकारच्या लग्नामध्ये मी कधीही आलो नाही व ऐकले सुध्दा नाही की पाणी द्राक्षरस मध्ये बदलून जाते.
येशू नाजरेथ कराचे हे काम आहे.
तो कोण आहे?



गलील सरोवराजवळ कफर्नुहून हे मासेमारीचे भरभराटीचे गाव होते. येथे येशूने लोकांमध्ये देवाच्या राज्याबद्दल बोलायला सुरवात केली.
आणि तेथे त्याने त्याचे पहीले शिष्य निवडले.
पेत्रा, खोल पाण्यात जा आणि तेथे तुझे जाळे टाक.
गुरुजी, आम्ही संपूर्ण रात्र परिश्रम केले परंतु काही पकडले नाही.
परंतु तुम्ही म्हणता म्हणून.
हे काय मला विश्वास होत नाही.


याकोब,योहान येथे या आता पुष्कळ पकडल्या आहे.
प्रभू मला जाऊ दे मी पापांणी भरलेला मनुष्य आहे.
पेत्रा भिऊ नको.
चला माझ्या मागे या मी तुम्हाला माणसे पकडणारा बनवतो.
माझ्या मागे या.


येशू शिष्यांसोबत संपुर्ण गालील प्रांतात गेला, प्रत्येकाला देवाच्या राज्याबददल सांगितले. त्याने प्रत्येक प्रकारच्या रोग्यांना बरे केले, दुष्ट आत्म्यांना काढले आणि लोक आश्चर्यचकित होऊन येरुशलेमातून व आजूबाजूच्या प्रांतामधून आले ते त्याचा प्रत्येक शब्द ऐकत असे.
जे रडतात ते धन्य कारण ते पुन्हा हसतील.
जे भुकेले ते धन्य कारण ते तृप्त होतील.
जे गरीब ते धन्य कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.
तुम्ही धन्य आहा जर लोक माझ्यामुळे तुमच्याशी वाईट वागतात. आनंदीत व प्रसन्न राहा कारण की स्वर्गामध्ये तुम्हाला याचे प्रतिफळ मोठे आहे.





जशी वागणूक तुम्हा स्वतःला दुस-यांकडून पाहिजे तशीच वागणूक तुम्ही प्रत्येकासोबत ठेवा.
शत्रू प्रेम करा आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करा.
चांगल्या गोष्टी गुप्तपणे करा म्हणजे त्याचा दिखावा होणार नाही.
जो कोणी स्त्रीकडे वाईट नजरेने बघतो त्याने तिच्या सोबत मनामध्ये व्यभिचार केला आहे.
डोळा हा शरीराचा दिवा आहे. जर तुझा डोळा स्वच्छ आहे तर तुझे संपुर्ण शरीर प्रकाशित होणार. परंतु डोळा जर दूषीत आहे. तर तू अंधारात असणार.
कोणीही दोन गुरूंची चाकरी करु शकत नाही, जसे देवाची किंवा धनाची.
उद्याची चिंता करू नका, पहिले देवाच्या राज्याचा शोध घ्या आणि मग सर्वकाही मिळणार.
जर तुम्ही माझ्या वचनावर चालणार, तर तुम्ही त्यासारखे आहा जो आपले घर खडकावर बांधतो. नाही तर तुम्ही त्यासारखे आहा जो आपले घर वाळूवर बांधतो.



एके दिवशी कफर्नहूममध्ये येशूच्या घराभोवती लोकांची गर्दी होती.
आपण आत मध्ये जावू शकत नाही.
वर तेथे काय घडत आहे?
तेथे छप्पर असेल?
त्यांना येवू द्या! त्याच्या मित्रांचा भरपूर विश्वास आहे.
तुझ्या पापांची क्षमा झाली आहे.
तुम्ही ते ऐकले? ते तो कसा करु शकतो?
हा वेडा देव आहे!
फक्त देव पापांपासून कोणालाही मुक्त करु शकतो.
एका लंगडया माणसाला काय म्हणणे सोपे आहे, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे किंवा 'उभा रहा'?
पापांची क्षमा करण्याचा अधिकार मसीहाला आहे. परंतु मी हे सुध्दा म्हणतो, तुझी बिछाना घे आणि चालता हो.



अविश्वासनिय.
होय, मी चालू शकतो.
तो चालत आहे.
परंतु तेथे प्रत्येकजण येशूच्या कार्याबदल आनंदी नव्हते. धार्मिक पुढारी शब्बाथाच्या पवित्र दिवशी येशू काय करतो यावर ते लक्ष ठेवत असे. या दिवशी इस्त्रायलमध्ये कोणतेही काम करण्यावर बंदी होती.
हया मणुष्याचे हात सुकले आहे. या दिवशी याला बरे करणे अशी परवानगी आहे का?
तुझे हात लांब कर!
होय.... मी बरा झालो.
आपण त्याला मुक्त कर्ताना पाहिले.
यरुशलेमच्या पुढा-यांनी अवश्य सांगावे की हा राज्याला चुकीच्या मार्गाने बहकवत आहे.



येशू व त्याचे शिष्य गालीली सरोवरातून जातात.
गुरूजी! मदत करा आपण बुडत आहो.
तुम्ही का भीत आहात? तुमचा विश्वास कोठे आहे?



शांत... थांबून जा!
त्यांनी त्यांची जहाज किणा-याजवळ बांधली परंतु पर्वतांमधून.
रारा राह...



तेथे दुष्ट आत्म्यांनी पछाडलेला एक मनुष्य होता, तो पर्वतांमध्ये राहत असे.
तो कुरुप.
तो येत आहे.
बर बर येशू!
हे सर्वशक्तीमान देवाच्या पुत्रा मला तुझ्याशी काय काम आहे?
दुष्ट आत्मांनो सोडा याला!
तुझे नाव काय?
सेना, कारण की आम्ही पुष्कळ आहोत.
हया डुकरांमध्ये आम्हाला जावू दे.
जा!



?
मी पुर्णपणे बरा झालो.
जा सोड आम्हाला.
काय मी तुमच्या सोबत येवू शकतो काय?
नाही, येथे थांब देवाने जे तुझ्यासाठी केले ते प्रत्येकाला सांग.


मी तुम्हाला सांगतो पुत्र स्वतः काही करु शकत नाही. तो फक्त ते करतो जे पित्या त्याला सांगतो. माझ्या बापाच्या इच्छेने. तो एक आहे ज्याने मला पाठवले.
येशू नेहमी शांत जाग्यावर प्रार्थनेसाठी जात असे.
रात्री प्रार्थनेनंतर येशूने त्याच्या १२ शिष्यांची निवड केली, त्याने त्यांना दोन दोन असे करुन बाहेर पाठविले व त्यांना दुष्ट आत्म्यांवर व सर्व प्रकारच्या रोगांवर अधिकार दिला.
ते दोघे भाऊ आहेत, पेत्र आणि आंद्रिया...
हे भाऊ याकोब... आणि योहान...
फिलीप आणि बर्थलमय...














हे १२ शिष्य त्यांच्या सोपवलेल्या कामावरुन उत्साहाने परत आले. नंतर येशू त्यांच्या सोबत एका शांत जागेवर जाण्यासाठी प्रयत्न करत होता परंतु गर्दी त्याला सोडायला तयार नव्हती.






येशू बोलत होता आणि पुन्हा लोकांना बरे करीत होता, तेथे उशीर झाला.
फिलीप, या सर्व लोकांना कसे जेवन मिळणार? तुम्हीच त्यांना का बरे काही देत नाही?
चांदीचे २०० नाणे हे काही आणण्यासाठी पुरेशं नाही!
येथे हा मुलगा आहे त्याच्याजवळ पाच भाकरी व दोन लहान मासे आहे. हे एवढेच आहे.
लोकांना येथे ५० च्या जमावाने असे बसवा.
येशू देवाला धन्यवाद देतो.
तो भाकरी व मासे तोडतो.


जेव्हा येशू जेवणाला बहुगुणीत करतो, तेव्हा हजारो लोक जेवले.
आपल्याला राजा भेटला आहे.
तो मसीहा आहे जो येणार होता.
अरे बघा येथे १२ पुर्ण भरलेल्या टोपल्या उरल्या!
आता लोकांची घरी जाण्याची वेळ झाली आहे तुम्ही जहाज घेवून दुसज्या बाजूला जावे, मी येथे पर्वतांमध्ये प्रार्थनेसाठी थांबत आहे.



नंतर...
अरेरे... तो भूत आहे.
भिऊ नका मी आहे.
प्रभू जर तो तू आहे तर मला पाण्यावर तुझ्याकडे येवूदे.
पेत्रा ये.
प्रभू मला वाचव.
पेत्रा तु संशय का केला.


तेथे काही लोक येशूला राजा घोषित करत असे. त्यांची अशी आशा होती की येशूला अधिकाराने हे रोमन अधिकारी काढून टाकणार. येशूचे विरोधक वाढत होते. ते नेहमी त्याची आलोचना करीत, येशू विरुध्द लोकांना करणे, त्यांच्यापासून त्यांना मुक्त करणे असे त्यांना वाटत असे.
गुरुजी, तुम्ही येथे कधी आलात?
मी तुम्हाला भाकर दिली म्हणून तुम्ही मला शोधत आहे काय?
नाशवंत भोजना बद्दल काळजी करु नका, परंतु त्या भोजना बद्दल करा जे राहणार व अनंत जिवन देणार.
मी अनंत जिवनाची भाकर आहे हे माझे शरीर आहे जे जगाच्या उध्दारासाठी दिलेले आहे.
हा मणुष्य कसा हयाचे शरीर आपणास खाण्यासाठी देवू शकतो?
मूर्खपणाची बडबड!
चला जावू या!
तो प्रत्येकाला फसवत आहे.
तुम्हालासुध्दा जावयाचे आहे का?
प्रभू, आम्ही कोणाकडे जावू? तुझ्याकडे अनंत जीवणाचे वचन असे आहेत.


येशूचा विरोध वाढतच होता. त्याने आता गालील प्रांताला सोडून इस्त्रायलच्या दुस-या भागात त्याचे काम पुरुष आणि स्त्री अनुयायांबरोबर चालूच ठेवले.
गालील
यरुशलेम
इस्रायल
नंतर तो यरुशलेममध्ये राहीला.
लोक माझ्याबदल काय विचार करतात, मी कोण आहे?
ते विचार करतात की तू भविष्यवक्ता आहे.
प्रवास करतांना...
आणि तुम्ही?
तुम्ही काय विचार करता की मी कोण आहे?
तू तारणारा आहेस जिवंत देवाचा पुत्र.
कोणालाही सांगू नका, की मसीहाचा यरुशलेम मध्ये छळ होणार व तेथे मृत्यूदंड मिळणार. परंतू तिस-या दिवशी तो कबरे मधून पुन्हा उठणार.



येरुशलेमच्या बाहेर नेहमी लोकांना रोमन पध्दतीने वधस्तंभावर मृत्युदंडाची शिक्षा मिळत असे.
जर कोणाला माझ्यामागे यायचे आहे तर त्याने अवश्य आपला वधस्तंभ घेवून माझ्या मागे यावे.
जे कोणी आपला प्राण वाचवू पाहतात ते त्याला गमावतील व जे कोणी माझ्यासाठी त्यांचे प्राण गामावतात ते त्याला वाचवतील.
तुम्ही हे माहीती करुन घ्या की फक्त एकच देव आहे.
महत्वाची गोष्ट अशी आहे की तुम्ही देवावर पूर्णपणे प्रीती करा आणि तुम्ही स्वतःवर प्रीती करता तशीच इतरांवर सुध्दा प्रीती करा.



त्यावेळी इस्त्रायलमध्ये महारोग असणारे लोक होते, महारोग हा त्वचेचा भयंकर असा रोग आहे. असे लोक गावाच्या बाहेर असायचे व त्यांना चांगल्या लोकांशी संपर्क करता येत नसे.
महारोग असणारे लोक कुठेही जातांना ते मोठयाने दूसऱ्या लोकांना सावध करत असत की ते येत आहेत.
महारोगी! महारोगी!
येशू गुरुजी आम्हावर दया कर.


जा तुम्ही स्वतः धर्मगुरुला दाखवा.
तपासण्यासाठी धर्मगुरूकडे जाणे?
काय आम्ही तेव्हा बरे होऊ का?
?
!
बघा मी बरा झालो!
आम्ही बरे झालो!
होय!
हालेलुया! देव चांगला आहे! धन्यवाद!
जे बरे झाले ते १० नव्हते काय? ते दुसरे कोठे आहेत? देवाला धन्यवाद द्यायला ते आले नाही?
उठ तुझ्या विश्वासाने फक्त तुला बरे केलेले नाही तर तुझा उध्दार सुध्दा झाला.



यहूदी पुढारी यरुशलेम मध्ये येशूच्या मागे गुप्तचर पाठवत असे. येशूच्या कामाबदल ते त्याच्या विरुध्द होते.
तो वाईट लोकांच्या संपर्कामध्ये राहत असे जसे की वेश्या, कर घेणारे रोमन अधिकारी...
मसीहा हरवलेल्या लोकांना शोधावयास व त्यांना वाचवण्यासाठी आला आहे.
कारण येशू शब्बाथ दिवशी लोकांना बरे करतो.
बरा हो!
आणि त्याचे लेकरांनावर विशेष लक्ष असायचे...
लेकरांना माझ्याकडे येवू द्या. देवाचे राज्य यांच्या सारख्यांचेच आहे.



येशूला बेथानी येथे बोलावले, एक गाव जे येरुशलेम जवळ आहे. लाजर तेथे बिमार आहे, लाजर आणि त्याच्या दोन बहिणी मार्था व मरीया हे येशूचे मित्र आहेत. जेव्हा येशू बेथानी मध्ये येतो तेव्हा तो ऐकतो की लाजराला कबरेमध्ये पुरवून चार दिवस झाले होते.
प्रभू!
प्रभू, जर तू येथे असता, तर माझा भाऊ मरण पावला नसता.
मार्था, तुझा भाऊ पुन्हा उठणार.
होय मला माहित आहे की तो शेवटच्या पुनरुत्थानाच्या दिवशी पुन्हा उठणार.
पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो कोणी माझ्यामध्ये विश्वास करतो तो जगणार. तू याच्यावर विश्वास करते का?
होय गुरूजी, मी याच्यावर विश्वास करते की जो तारणारा जगामध्ये येनार होता तो तूच आहेस, देवाचा पुत्र.
त्याला तुम्ही कुठे पुरले आहे?
प्रभू, ये आणि बघ.


हे बघ, तो खरच त्यावर प्रेम करतो.
परंतु तो लाजरला मरणा पासून वाचवू शकला नाही?
येथे त्याला कपड्यामध्ये गुंडाळून पर्वतांच्या कबरे मध्ये ठेवले होते.
हया दगडाला काढा.
प्रभू, त्याचा वास येणार पहिलेच चार दिवस झालेले आहेत.
तुम्ही देवाची महिमा बघाल.
पित्या, मी हे म्हणत आहे, येथील लोक विश्वास करतील की तू मला पाठविले आहे.
लाजरा बाहेर ये!
हे कबरेतील कपडे काढा आणी त्याला जावू द्या.



यरूशलेमेतील अधिकारी आता येशू व त्याच्या शिष्यांनबदल अधिक विचार करू लागले.
तो मनुष्य पुष्कळशे चमत्कार करतो.
जर आपण असेच चालू दिले तर रोमी काहीतरी करतील.
ते आपले राज्य व मंदिरे यांचा नाश करतील.
तुम्ही थोडा विचार करा, संपूर्ण राज्याचा नाश होण्यापेक्षा एका मनुष्याचा मृत्यु होणे बरे आहे.
त्यासाठी येशूला मारणे आता आवश्यक आहे.
त्यावेळेपासून यहूदी पुढारी येशूला पकडण्याची संधी बघून त्याला रोमनांना सोंपविण्यासाठी प्रयत्न करत असत. ते मृत्युदंडाची शिक्षा देणारे असे अधिकारी होते.


येशू बेथानी येथे असतांना...
मरिया!
ते पुष्कळ महागडे अत्तर आहे.
हयापेक्षा हयाचे पैसे गरिबांना देणे उत्तम होते.
तिला एकटे सोडून दे यहूदा, ती माझे शरीर पुरवण्यासाठी तयारी करत आहे.


पासकाचा सण जवळ आला होता, लोकांचा
जमाव हा येरुशलेमकडे प्रवास करत होता...


येरूशलेमकडे अधिकारी लोक
येशूला अटक करण्याची योजना
बनवत होते. येशूला हयाच
शहराकडे जायचे होते.



येशूचा लोक जयघोषणे व स्वागत करत होते.
होसन्ना!
होसन्ना!
हा इस्त्रायलाचा राजा.
देवाच्या नावाने जो येत आहे तो धन्य.
यरूशलेम, जर तुला शांती कशी मिळवायची हे माहित असते तर. पण तुला ते नको आहे.
हयाच्यासारखा आपल्याला कोणीही मिळणार नाही.
संपूर्ण राज्य त्याच्या मागे जात आहे.


राजधानीच्या मध्यभागी आराधना करण्याचे मंदीर आहे.
पासकाच्या सणाच्या वेळी कोकरांची कत्तल होत असे.
कोकरांना मंदिरामध्ये अर्पण करून देवा व मनुष्यांनमध्ये मेल मिलाप करत असत.
परंतु कोणत्या प्रकारचे कोकरु अर्पण केल्याने लोकांना त्यांच्या पापाणंपासून मुक्ती मिळू शकते?
मंदीराच्या पटांगणात लोक त्यांचा व्यवहार व पैशांची अदला-बदल करत असत.
येशू सुध्दा तेथे आहे.


देवाचे घर हे प्रार्थनेचे घर आहे, परंतु तुम्ही ते चोरांची गुहा बनवली आहे.
तो धोकादायक आहे लोक हयाची प्रत्येक गोष्ट ऐकतात.
हयाच्यापासून आपली सुटका झाली पाहिजे.


जर आपण त्यावर लक्ष ठेवू तर त्याला आपण पकडू शकतो व त्याला मृत्युदंड देवू शकतो.
परंतु हया सनाच्या वेळी नाही, हया पासकाच्या वेळी कोणताही त्रास आपल्याला पाहिजे नाही.
त्याच्यासाठी मला तुम्ही किती जास्त पैसे देणार?
तो यहूदा आहे त्यांच्यातील एक शिष्य.
मी येशूला पकडून तुम्हाला सोपवणार.
येशूसाठी आम्ही तुला ३० चांदीची नाणी देतो, एका गुलामाची किंमत.


पासकाच्या सणाच्या पहिले येशू मंदिरामध्ये बोलत असे. पूढारी लोक त्याच्यासाठी समस्या तयार करत असे.
त्या संध्याकाळी येशू व त्याचे १२ शिष्य पासकाच्या मेजवानीसाठी ऐकत्र जमतात.
मी ते आज रात्री करतो.


माझ्या दुःखयातनेच्या पहिले या पासकाचे भोजन मी तुमच्या सोबत करावे हयाची मी वाट बघत होतो.
अधिकारी लोक दुस-यांकडून सेवा करून घेतात, परंतु तुमच्या सोबत मी ते करणार नाही.
हा अधिकारी तुमचा सेवक असणार.
मी तुम्हामध्ये सेवक असा आहे.


प्रभू, तू दास म्हणून माझे पाय धुणार काय? नाही, कधीही नाही.
पेत्रा, जर मी तुझे पाय धुणार नाही तर मग तु माझ्यापासून नाही.
प्रभू, तर माझे डोके व हात सुध्दा धुवून काढा.
कोणी एकाने जर आंघोळ केली आहे तर त्याचे मात्र पायच धुणे गरजेचे आहे.
तुम्ही मला प्रभू व गुरूजी अशी हाक मारता, जे बरोबर आहे. जसे मी तुमचे पाय धुतले, म्हणून तुम्ही सुध्दा अवश्य अशाप्रकारे एकमेकांची सेवा करा.
तुमच्या पैकी कोणीएक माझा विश्वासघात करणार.
कधीही नाही.
तो मी तर नाही ना?
यहूदा जे तुला करायचे आहे ते लवकर कर.



माझ्या आठवणीसाठी हे नेहमी करा...
ही भाकर घ्या जे माझे शरीर आहे.
हा प्याला घ्या, हे माझे रक्त आहे जे तुम्हासाठी सांडवण्यात येईल. अश्याप्रकारे देव तुमच्यासोबत एक नविन वाचा करत आहे.
एक नविन आज्ञा मी तुम्हाला देतो एकमेकांवर प्रिती करा. जशी मी तुम्हावर केली.
जर तुम्हामध्ये ही प्रीती आहे तर सर्वांना माहिती होणार की तुम्ही माझे शिष्य आहात.
प्रभू मी तूझबरोबर सर्ववेळ असणार, तुझ्यासाठी मी माझा प्राण सुध्दा देणार.
पेत्रा त्यावेळी कोंबडा आरोळी मारणार आणि तू तीन वेळा माझा नकार करणार.


त्या संध्याकाळनंतर येशू व त्याचे शिष्य ते शहर सोडतात. यहूदा त्यांच्या सोबत नाही.
मी तुम्हाला सोडणार आहे, परंतु पिता तुम्हाकडे पवित्र आत्मा पाठवणार आहे. तो तुम्हाला मदत करणार व नेहमी तुम्हासोबत राहणार.
जेथे मी जात आहे ती जागा तुम्हाला माहीत आहे.
मार्ग, सत्य व जीवन मीच आहे. माझ्या वाचून पित्याकडे कोणीच जावू शकत नाही.
तुम्ही येथे थांबा. मी प्रार्थनेसाठी थोडा पुढे जातो.
पिता, जर हे शक्य असेल तर हे दुःख माझ्यापासून दूर कर.
तरी सुध्दा, माझ्या ईच्छेने नाही तर तुझ्या ईच्छेप्रमाणे होऊ दे.




अश्यावेळी तुम्ही कसे झोपू शकता? उठा जो एक माझा विश्वासघात करणार आहे तो येथे आहे.
ज्याचे मी चुंबन घेईन त्याला पकडा.
गुरुजी!
यहुदा, तू चुंबन घेवून मसीहाचा विश्वासघात करणार काय?
गुरुजी आम्ही भांडू?
नही!
येशूने त्यांना पकडू दिले, त्याचे सर्व अनुयायी तेथून पळून गेले.



येशूला प्रमुख याजकाकडे नेण्यात आले, यहूद्यांचा सर्वात मोठा पुढारी, पेत्र व योहान काही अंतरावर मागे येत होते.
पेत्र अंगणात जातो.
तू त्याच्याबरोबर नव्हता काय?
नाही, नाही, मी त्याला ओळखत नाही.
तू त्यांच्यामधील एक नाही काय?
अगदी नाही.
माझी खात्री आहे तू तेथे होता, तो एक गालीली आहे.
तुम्ही काय बोलत आहे हे मला माहीत नाही.



कु कु - अकड डु कुकु!
येशू पेत्राकडे पाहतो...
चल भविष्यवाणी कर कोणी तुला मारले.
सकाळी येशूला यहूदाच्या कचेरीत नेले.
तू देवाचा पुत्र आहे काय?
जसे तुम्ही म्हणता तसे आहे.
हा मृत्युच्या योग्य आहे. रोमीला हा प्रयत्न करु द्या.



येशूला रोमी राज्यपाल पिलाताकडे आणतात. हे यहूदी पुढारी ते सर्व हालचाली बघत होते. ते सर्वप्रकारचे दोषारोप करत होते.
हया सर्व दोषारोपांबदल तू काय म्हणतो? काहीच नाही?
तू काय केले आहे?
मी सत्याची साक्ष दयायला आलो आहे.
सत्य काय आहे?
मला याच्यामध्ये काहीही दोष आढळून येत नाही. आता वल्हाणडण्याचा सण आहे. मी कोणाला मुक्त करू, बरब्बाला अथवा या यहूदाच्या राजाला?


बरब्बाला!
बरब्बाला!
परंतु हया येशू सोबत मी काय करावे असे तुम्हाला वाटते?
त्याला वधस्तंभावरखिळा.
तो समजतो की तो राजा आहे.
जर तू त्याला सोडून देतो तर तू कैसराचा मित्र नाही.
हयाच्या ऐवजी तू मुक्त होऊ शकतो.
बरब्बाला मुक्त केले. तो राज्यातील एका खूना प्रकरणी दोषी सापडला होता.
...,३७ ३८ ३९!
त्याच्या रक्ताबदल मी निर्दोष आहे.
हे यहूदाच्या राजा.


मनुष्याकडे बघा.
याला वधस्तंभावर खिळा.
याला वधस्तंभावर खिळा.
याला वधस्तंभावर खिळा.
पिलाताने ते वाक्य मान्य केले. वधस्तंभावर खिळणे हा एक भयचकित करणारा मृत्यु होता. येशू हया वधस्तंभाचा खांब मोठया कष्टाने यरुशलेमच्या रस्त्यावरुन वाहत होता.
मृत्युदंड देण्याचे कार्य हे शहराच्या बाहेर होत असे, त्याला गुलगूथा म्हणजेच कवटी ची जागा म्हटले गेले.
येथे सैनिकांनी येशूला वधस्तंभावर खिळले.


हयाचवेळी यहूदाला त्याने केलेल्या कामाचा पश्चाताप होतो...
मी चुक केली.
मी हया निर्दोष रक्ताचा विश्वासघात केला.
आम्हासोबत तुझे काय काम? ती तुझी समस्या आहे.
येशू दोन गुन्हेगारानमध्ये वधस्तंभावर होता.
पिता हयांना क्षमा कर, ते काय करत आहे हे त्यांना समजत नाही.



वधस्तंभावर एक लेख तीन भाषांमध्ये लिहीला होता त्याचा अर्थ म्हणजे "येशू हा यहूद्यांचा राजा"
IESVS NAZARENVS REX IVDAEORVM
येशूने कडू द्राक्षरस पिणे नाकारले.
सैनिक त्याच्या कपडयांसाठी खेळ खेळतात.
होय त्यांने दुस-याला वाचवले नाही काय?
जर तू देवाचा पुत्र आहे तर हया वधस्तंभावरुन स्वतःला मुक्त कर.
स्वतःला वाचव आणि आम्हाला सुद्धा.
थोडा देवाचा सन्मान करा. आपल्याला आपल्या कामाची शिक्षा मिळाली, परंतु हया मनुष्याने काही चुक केली नाही.
तुझ्या स्वर्गीय राज्यात माझी आठवण कर.
मी तुला खात्री देतो, आज तू माझ्या सोबत सुखलोकात असशील.




अंदाजे बारा वाजता सुर्य झाकल्या गेला. सर्विकडे अंधार झाला.
मरीया येशूची आई, आणि योहान त्याचे शिष्य वधस्तंभा जवळ उभे होते.
आता ही तुझी आई व हा तुझा मूलगा.
माझ्या देवा, माझ्या देवा तू माझा त्याग का केला?
मला ताहान लागली!
पिता माझा आत्मा मी तुझ्या हाती सोपवतो.
ते पुर्ण झाले आहे.



येशूची मृत्यु दुपारी तीन वाजता होते. एक सैनिक येशूला भाला भोसकतो तेव्हा पाणी आणि रक्त वाहते.
असे लिहीले आहे की एखाद्या कोकराप्रमाणे तो पुढे कत्तल खाण्यात जाईल.
आपल्या सर्व पापांसाठी त्याला मारतील, भोसकतील. आता तो मेला आहे.
हाच मसिहा होता का जो येणार होता? नाही?
आपण याला पुरवू शकतो काय? चला त्यांना विचारु.
योसेफ हा अरिमथाई आणि निकदेमस येशूचे शरीर घेतात. ते त्याला पांढ-या कपड्यामध्ये गुंडाळून मसाल्यासोबत कबरेमध्ये ठेवून ते त्यावर मोठा दगड ठेवतात.



या सर्व गोष्टीनंतर वल्हांणडणाच्या समयी, काही स्त्रिया त्या बंद कबरे जवळ जातात.
हा दगड बाजूला सरकला आहे.
तुम्ही हया जीवंताला मरना मध्ये का बघता? तो जिवंत झाला आहे. जा आणि त्याच्या शिष्यांना सांगा.
जेव्हा ते हे सर्व ऐकतात, पेत्र आणि योहान कबरे कडे धावतात.
काय झाल?
ते पूर्णपणे खाली आहे.


बाहेर कबरे भोवती बागेत...
हे बाई, तू का रडत आहे? तू कोणाला शोधत आहे?
श्रीमान, तुम्ही त्याला ठेवले आहे काय?
मारिया!
गुरूजी!
माझ्याजवळ थांबू नको माझ्या भावांना सांग की मी परत माझ्या व तुमच्या पित्याकडे जात आहे. माझा देव व तुमचा देव.



त्याच दिवशी दोन येशूचे निराश अनुयायी स्वतःला एका वाटेकरु सोबत भेटून येशूच्या घटनेबदल चर्चा करत असतात.
तुम्ही भविष्य वक्त्यांवर विश्वास ठेवत नाही काय? त्याच्या महीमेमध्ये प्रवेश करण्यासाठी मसीहाला दुःखातून जाणे नाही आहे काय? ते सर्व पुस्तकांमध्ये लिहिले होते.
अचानक भोजनाच्यावेळी कोण येते.
परंतु तो येशूच होता.
दुसरे शिष्य, ते येशूला शोधायला जातात.
आम्ही प्रभूला पाहिले.
मरिया व पेत्राने सुध्दा.
अचानक...
तुम्हास शांती असो!
तुम्ही विश्वास करत नाही काय, मी आहे? माझ्या हाताला व पायाला बघा.
माझ्या प्रभू माझ्या देवा.


येशू त्याच्या अनुयायांना पुढे ४० दिवस दिसला. तो एकदा तर ५०० लोकांना एकाच वेळी दिसला. एक दिवशी येशूचे काही शिष्य गलीली तलावामध्ये मासेमारी करत होते.
तुम्हाजवळ काही खाण्याकरता आहे का?
नाही. आम्ही काही पकडले नाही.
तुमचे जाळे दुस-या बाजूला टाका.
अरे छान काय पकडले!
तो प्रभू आहे.
गुरूजी!
तू येणार आणि माझ्याबरोबर जेवणार काय?


पेत्रा, तू खरोखर माझ्यावर प्रीती करतो काय?
येशू हा प्रश्न पेत्राला तीन वेळा विचारतो...
होय प्रभू, तुला माहिती आहे मी तुझवर प्रेम करतो.
माझ्या मेंढरांना सांभाळ.
माझ्या मागे या.
स्वर्ग व पृथ्वी यांचा सर्व अधिकार मला प्राप्त झाला आहे. जगामध्ये जा व प्रत्येक राष्ट्रांमध्ये माझे शिष्य बनवा, त्यांना पिताच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या, आणि ज्या गोष्टी मी तुम्हास सांगितल्या त्या त्यांना शिकवा.
हे लक्षात ठेवा, मी तुम्हाबरोबर नेहमी आहे प्रत्येक दिवशी व जगाच्या अंता पर्यंत आहे.
हया शब्दानंतर येशू पृथ्वी सोडतो व स्वर्गामध्ये घेतल्या जातो. परंतु त्याने असे सुध्दा म्हटले की लोकांचा न्याय करावयास तो पुन्हा येणार आहे...

त्याचे शिष्य यरुशलमेत प्रार्थना करतात. पवित्र आत्मा हा देवाचा आत्मा त्यांना भरतो हाच पवित्र आत्मा जो येशूबरोबर होता तो आता त्यांच्याबरोबर आहे. नवीन लोक येशूसाठी तयार करण्यास तो मदत करतो.











आता येशूचे अनुयायी संपुर्ण जगामध्ये एकत्र येवून प्रार्थना करतात व बायबल वाचतात. ते येशूच्या मृत्यूची भाकर मोडून व द्राक्षरसानी आठवण करतात. ते देवाचे प्रेम अश्याप्रकारे दुस-यांवर करतील, जे त्यांच्या हृदयांमध्ये आहे.



येशूने देवाचा उद्देश पुर्णपणे मनुष्यांसाठी केला.
येशू आपल्यावर प्रेम करतो त्याला धन्यवाद द्या व त्याची आराधना करा.
देवाने जगावर एवढे प्रेम केले की त्याने आपला एकुलता एक पुत्र हयासाठी दिला की जो कोणी त्यावर विश्वास ठेवतो त्यांचा नाश होणार नाही परंतु त्यांना अनंत जीवन असणार.
WILLEM DE VINK

## बायबल

येशूची गोष्ट बायबलमध्ये नोंदीत आहे. बायबल पेक्षा कोणतेही पुस्तक अधिक वेळी वाचल्या गेले नाही. हे पूर्ण पुस्तकांचे एक ग्रंथ आहे. १५०० वर्ष हे पुस्तक लिहिण्यासाठी लागले. १९०० वर्षांपुर्वी बायबल हे पुर्ण झाले. हयामध्ये सर्व प्रकारच्या गोष्टी आहे, की कसा देव मनुष्यांच्या जीवनामध्ये समाविष्ट होता. देव कोण आहे हे येशूच्या गोष्टीमध्ये स्पष्ट दिसून येते.

## येशूचा इतिहास

बायबल मध्ये ४ पुस्तकांनमध्ये येशूच्या जिवनाविषयी सांगितले आहे. येशूच्या काळात हे लेखक राहत होते. लेखकांची नावे त्यांनी दिलेले आहे.



१.**मत्तय**: येशूचा एक शिष्य. तो कर घेण्याचे काम करत असे. त्याने वर्णन केले की कश्याप्रकारे येशू इस्त्रायली लोकांशी वागला. (यहूदी)

२. **मार्क**: येशूने केलेले चमत्कार याने लिहीले जेव्हा येशूने कार्य केले तेव्हा मार्क किशोरावस्थामध्ये होता.

३. **लूका**: हा एक वैद्य होता. तो व्यक्तीगतरित्या येशूला जाणत नव्हता त्याने वर्णन केले की कश्याप्रकारे येशू लोकांशी वागला.


४. **योहान**: येशूचा एक अनुयायी, येशू कोण आहे हे त्याने सांगितले, येशू देव आहे, जो मनुष्य बनला की लोकांना त्यांच्या पापांण पासून मुक्त करावे.


## येशूचा जन्म

येशूची आई मरीया हिचे लग्न झाले नव्हते जेव्हा येशूचा जन्म झाला ती एक कुमारिका होती परंतु येशूच्या जन्मासाठी देवाने योजना बनवली. ही गोष्ट पहिलेच पुस्तकामध्ये लिहील्या गेली होती. येशू एखाद्या महापुरुषाप्रमाणे किंवा काही विशेष स्वरूपाने जन्मला नाही. परंतु तो गाईच्या गोठ्या मध्ये जन्मला.


## येशूचे चमत्कार

येशूने अनेक चमत्कार केले बायबलमध्ये ४० पेक्षा जास्त चमत्कारांची नोंद आहे. हया चमत्कारांव्दारे येशू देवाच्या शक्तीचा व प्रेमाचा अनुभव लोकांना देतो. त्याला लोकांची मदत करायची आहे व त्यांना आनंदी ठेवायचे आहे.





# येशूचा मृत्यु व पुनरुत्थान



***येशू का मरण पावला? हयाचे स्पष्टीकरण बायबलमध्ये दिलेले आहे.***

येशू का मरण पावला? हयाचे स्पष्टीकरण बायबलमध्ये दिलेले आहे.
येशू ने स्वइच्छेनेआपल्या पापांची शिक्षा स्वतःवर घेतली. आणि टी शिक्षा मृत्यू होती. येशू आपल्या साथी मरण पावला होता. आता पुन्हा आपण देवाशी मैत्री करु शकतो, परंतु आपल्याला आपल्या चुकांची क्षमा मागायची आहे.
येशू मृत्यूमधून पुन्हा जिवंत झाला. देवाने त्याला जिवंत केले. याव्दारे देवाने दाखवले की तो मृत्यूवरही शक्तीशाली आहे.
येशू आता देवाबरोबर राहतो, त्यामुळे तो आपला मित्र बनू शकतो. देवाला आनंद होईल अशा प्रकारच्या जगण्यासाठी तो आपल्याला मदत करतो.

## प्रार्थना

*जर तुम्ही चुकीच्या गोष्टी साठी क्षमा मागता आणि देवासोबत मैत्री करू पाहता तर तुम्ही ही प्रार्थना करु शकता:*
*प्रिय देवा, तू माझ्यावर प्रेम करतो.*
*तू येशू दिला, तुझा एकुलता एक पुत्र तो क्रुसावर मरण पावला.*
*जे चुकीच्या गोष्टी मी केल्या त्या सर्व गोष्टींसाठी येशू क्रुसावर मरण पावला.*
*माझ्या पापांनसाठी कृपया मला क्षमा कर. मला माफ कर.*
*येशू माझ्या सोबत आहे म्हणून तुला धन्यवाद.*
*मला नेहमी तुझेच राहायचे आहे.*
*कृपया मला तुझ्या इच्छेप्रमाणे जगण्यास मदत कर.*
*तू नेहमी माझ्या सोबत राहशील काय?*
*माझ्या प्रार्थनेच्या उत्तराबदल धन्यवाद देतो.*
*काय तू जे वचन देतो ते तू पूर्ण करतो.*

# येशू आणि तुम्ही

येशूच्या कथेचा एक चांगला शेवट आहे. येशू पुष्कळ महान लोकांचा मित्र बनला. तेंव्हा आणि आता सुध्दा जग बदलले आहे. पुष्कळ लोक आता गाढवांवर किंवा घोड्यांवर प्रवास करत नाही, तर ते कारने व विमानांनी प्रवास करतात. परंतु याचा येशूवर काहीही फरक होत नाही. जसा तो इस्त्रायल मध्ये होता तसाच आतासुध्दा तो आपल्या सोबत आहे, तो जरी अदृश्य आहे, पण तो सत्य असा आहे.

तो तुमचा मित्र बनू पाहतो. तुम्ही त्याचे ऐकू शकता.

तुम्हाला येशू सोबतचे जिवन व त्याच्याबद्दल अधिक माहीती करुन घ्यायची आहे का तर तुम्ही हया खालील गोष्टी करा:-

१) **तुम्ही स्वतः बायबल वाचणे**
(लूक ने लिहीलेले भाग तुम्ही वाचा)

२) **प्रार्थना करणे:**
(देवासोबत बोलणे आणि त्याचे ऐकणे, तुम्हाला विशेष कोणत्याही शब्दांची गरज नाही.)

३) **बायबल बद्दल व येशू बद्दल दुसऱ्या लोकांशी बोलणे**. येशूची इच्छा आहे की, त्याचे अनुयायी ऐमेकांना भेटून एकमेकांना उत्साहीत करतिल.



*भाषाः पहिली मराठी आवृत्ती: २०१४, २०१८ (येशू मसीहा) मराठी भाषांतर व छपाई: डिवाइन मीडीया, अमरावती.भारत*
*Jesus Messiah:*
*Marathi language edition: 2014, 2018, 2026 ISBN: 978-90-73150-31-7*
*Reprints by: Divine Media (Amravati-MH-India) Ph: +91-7276 487 095 web: www.divinemedia.webs.com*
*Text and illustrations: Willem de Vink.* *Copyright © 1993 Stichting Wereldtaal, Rotterdam,*
*Published in Dutch as "Jezus Messias".*
*Digital copyright under the terms of the Creative commons BY-SA licence All rights of translation, reproduction and adaptation reserved for all countries.*
*e-mail: jmpbk.app@gmail.com https://jesusmessiahcomicmedia.com/en/india*

*ही येशू मसीहा ची एक सत्य गोष्ट आहे. तो २००० वर्षापुर्वी इस्त्रायल मध्ये होता. प्रत्येकजण जो त्याला भेटायचे ते चकित झाले. त्याने जे काही केले ते कोणी करु शकले नाही. ज्या गोष्टी त्याने सांगितल्या त्या कोणीही सांगितल्या नाही. जेथे येशू असायचे तेथे चमत्कार घडायचे. जे कोणी त्याचे ऐकायचे आनंदी व सुखी होत असे, तेव्हा अचानक शेवट झाला असे वाटते, त्याचे शत्रू त्याला शिक्षा देतात, परंतु तो शेवट नव्हता. पुढे जे घडले ते तुम्ही स्वतः वाचा व बघा की कश्याप्रकारे येश मसीहाची गोष्ट पुढे चालू आहे.*



*Language: Marathi (India)*
*ISBN: 978-90-73150-31-7*